# पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर

## Punyashlok Ahilyadevi Holkar Solapur University, Solapur


केगाव, सोलापूर - ४१३ २५५, महाराष्ट्र (भारत)

दुरध्वनी क्र. ०२१७-२७४४७७१ / ७२/ ७३ (११ लाईन्स), फॅक्स : ०२१७-२३५१३००,

संकेतस्थळ: http://su.digitaluniversity.ac.in ई-मेल: scelection@sus.ac.in, registrar@sus.ac.in




पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ

॥ विद्यया संपन्नता ॥

NAAC Accredited-2015
'B' Grade (CGPA 2.62)

जा.क्र.पुअहोसोविसो/विद्यार्थी विकास विभाग (निवडणूक कक्ष)/ २०१९/ 5921 दिनांक: 31 JUL 2019

## परिपत्रक

विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालयातील प्राचार्यांना व विद्यापीठ परिसरातील सर्व शैक्षणिक संकुलांच्या संचालकांना आदेशाद्वारे कळविण्यात येते की, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ कलम ९९ नुसार व महाराष्ट्र शासनाच्या दिनांक २६ ऑक्टोबर, २०१८ रोजीच्या राजपत्रान्वये विद्यापीठ अधिविभाग विद्यार्थी परिषदेची निवडणूक नजिकच्या कालावधीत घ्यावयाची आहे. सदर निवडणूक निकोप वातावरणात व पारदर्शीपणे पार पाडण्याकरिता आपल्यावर खालीलप्रमाणे जबाबदाऱ्या देण्यात येत आहेत.

१. दिनांक २६ ऑक्टोबर, २०१८ च्या महाराष्ट्र शासनाच्या राजपत्रानुसार महाविद्यालयातील विद्यार्थी परिषदेच्या निवडणूकीकरिता संलग्नित महाविद्यालयाचे प्राचार्य / मान्यताप्राप्त संस्थेचे संचालक/ विद्यापीठ परिसर शैक्षणिक संकुलातील संचालक निवडणूक प्राधिकारी असतील.
२. प्राचार्यांनी महाविद्यालयामध्ये निवडणूकीच्या कामकाजासाठी महाविद्यालयातील वरिष्ठ शिक्षकाची निवडणूक अधिकारी म्हणून नेमणूक करावी. त्यांचे नाव व मोबाईल क्रमांक, ईमेल याची माहिती **scelection@sus.ac.in** या ईमेलवर दि.१० ऑगस्ट, २०१९ या तारखेपर्यंत पाठवावी.
३. प्राचार्यांनी कॉलेजमध्ये सर्व शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी यांना विद्यार्थी परिषद निवडणूकीबाबतचे प्रशिक्षण दयावे.
४. प्रत्येक शिक्षकाला एकेक वर्ग दयावा, शिक्षकांनी प्रत्येक वर्गामध्ये जाऊन विद्यार्थ्यांना विद्यार्थी परिषदेच्या निवडणूकीबाबतची माहिती दयावी.
५. विद्यापीठाकडून वेळोवेळी आयोजित करण्यात येणाऱ्या विद्यार्थी परिषदेच्या निवडणूक संदर्भातील कार्यशाळेकरिता "निवडणूक अधिकारी " यांना पाठवावे.
६. निवडणूक प्रक्रिया संदर्भात महाविद्यालय / संकुल स्तरावर विद्यार्थी परिषद निवडणूक समिती स्थापन करावी. त्यामध्ये खालीलप्रमाणे व्यक्तिंची नेमणूक करावी.

| **महाविद्यालया करीता** | | **संकुला करीता** | |
|---|---|---|---|
| मतदान केंद्राध्यक्ष | प्राचार्याने नियुक्त केलेला "निवडणूक अधिकारी" | मतदान केंद्राध्यक्ष | संचालक नियुक्त निवडणूक समन्वयक |
| मतदान अधिकारी | राष्ट्रीय छात्रसेना विभाग प्रमुख (NCC) | मतदान अधिकारी | शिक्षक |
| मतदान अधिकारी | संचालक, शारीरिक शिक्षण व क्रीडा | मतदान अधिकारी | शिक्षक |
| मतदान अधिकारी | राष्ट्रीय सेवा योजना, विभागप्रमुख (NSS) | मतदान अधिकारी | शिक्षक |
| मतदान अधिकारी | सांस्कृतिक विभागप्रमुख | मतदान अधिकारी | शिक्षक |
| महिला प्रतिनिधी | | महिला प्रतिनिधी | -- |
| राखीव प्रवर्ग प्रतिनिधी | | राखीव प्रवर्ग प्रतिनिधी | -- |

७. महाविद्यालय स्तरावर विद्यार्थी परिषदेच्या निवडणूकीची आचारसंहिता, विद्यार्थी परिषदेच्या निवडणूक प्रक्रियेबद्दल विद्यार्थ्यांना सविस्तर माहीती द्यावी.

८. विद्यार्थ्यांना विद्यार्थी परिषद निवडणूक व निवडणूक आचारसंहीता संदर्भात माहिती होण्यासाठी फ्लेक्स तयार करुन महाविद्यालय/ संकूल परिसरात दर्शनिय भागात लावून घ्यावेत.

९. महाविद्यालय व संकुलातील विद्यार्थी परिषदेच्या निवडणूक प्रक्रियेकरिता वर्गानुसार मतपेटया तयार करुन घ्याव्यात.

१०. संलग्नित महाविद्यालयातील प्राचार्य व संकुलातील संचालक यांनी मतदार यादी विद्यार्थ्यांच्या आडनावातील इंग्रजी वर्णानुक्रमे तयार करावी.

११. विद्यार्थी परिषद अध्यक्ष - फिकट गुलाबी रंग, विद्यार्थी परिषद सचिव - हिरवा रंग, विद्यार्थी परिषद महिला प्रतिनिधी - आकाशी रंग, विद्यार्थी परिषद राखीव संवर्गातील प्रतिनिधी - पिवळा रंग, विद्यार्थी परिषद वर्ग प्रतिनिधी - पांढरा रंग सदर दिलेल्या रंगाप्रमाणे मतपत्रिका तयार कराव्यात. सदरच्या मतपत्रिका महाविद्यालयांनी / स्वत: स्वखर्चाने तयार कराव्यात.

१२. मतपत्रिकेवर उमेदवारांची नावे नमुद करताना ती त्यांच्या आडनावातील इंग्रजी वर्णानुक्रमे नमुद करावीत.

१३. महाराष्ट्र शासनाच्या दिनांक २६ ऑक्टोबर, २०१८ रोजीच्या राजपत्रानुसार प्राचार्य व मतदान अधिकारी यांनी विद्यापीठास वेळोवेळी प्रशासकीय सहकार्य करणे बंधनकारक राहिल.

१४. महाराष्ट्र शासनाच्या दिनांक २६ ऑक्टोबर, २०१८ रोजीच्या राजपत्रानुसार निवडणूक प्रक्रीयेस महाविद्यालय व संकुलातील शिक्षक, शिक्षकेत्तर व प्रशासकीय कार्य करणाऱ्या कर्मचाऱ्यांनी प्राचार्य आणि निवडणूक अधिकारी यांना सहकार्य करणे बंधनकारक राहील.

१५. विद्यापीठाकडून वेळोवेळी देण्यात येणाऱ्या सूचनांचे पालन करणे संलग्नित महाविद्यालयातील प्राचार्य व विद्यापीठ परिसरातील संकुलाचे संचालक यांना बंधनकारक राहिल याची सर्व संबंधितांनी नोंद घ्यावी.

१६. मतदान व मतमोजणी ज्या कक्षात घेण्यात येणार आहे त्याठिकाणी सी.सी. कॅमेऱ्याची व्यवस्था असावी.

१७. निवडणूक व्यवस्थितरित्या पार पाडण्यासाठी महाविद्यालयातील प्राचार्य व संकुलाचे संचालक यांनी विद्यार्थी परिषद निवडणूकीकरिता आपल्या गरजेनुसार आपल्या कार्यक्षेत्रातील पोलीस स्टेशनला पत्र पाठवून पोलीस बंदोबस्त मागवून घ्यावा.

१८. महाविद्यालयातील / मान्यताप्राप्त संस्थेतील / संकुलातील विद्यार्थी परिषदेच्या निवडणूकीसाठी येणारा खर्च हा संबंधित महाविद्यालय / मान्यताप्राप्त संस्था यांनी करावयाचा आहे.

१९. आपणास विद्यार्थी परिषद निवडणूकीसंदर्भात कोणत्याही प्रकारची माहिती हवी असल्यास विद्यार्थी विकास विभागातील (निवडणूक कक्षाशी) कार्यालयीन वेळेत (सकाळी १०:२० ते ०६:००) ०२१७-२७४४७७०/१/२ Ext. ११९ या क्रमांकावर संपर्क साधावा.

उपरोक्तप्रमाणे दिलेल्या जबाबदाऱ्यानुसार प्राचार्यांनी/संचालक यांनी महाविद्यालयामध्ये व संकुलस्तरावर कार्यवाही करावी.

कळावे,

3/7/2019

(डॉ. प्रसंत कोरे)
संचालक, विद्यार्थी विकास

प्रत माहितीस्तव : १) मा. कुलगुरु कार्यालय.
२) मा. प्र-कुलगुरु कार्यालय.
३) मा. कुलसचिव कार्यालय.
४) मा. प्राचार्य, सर्व संलग्नित महाविद्यालये, पु.अ.हो.सोविसो.
५) मा. संचालक, सर्व शैक्षणिक संकुले विद्यापीठ परिसर.